# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 19/01/2022 (बुधवार)
(सायंकाळ)

---

### विनयभंग

पो.स्टे. बोरी :– दिनांक 01/12/2021 चे 00.00 वा. ते दिनांक 18/01/2022 चे 00.41 वा. दरम्यान फिर्यादी वय 42 वर्ष या शिक्षिका आहेत. दि. 01/12/2021 रोजी फिर्यादीचे व्हॉटसप नंबरवर अज्ञात आरोपीने हाय म्हणुन मॅसेज केला. तो मॅसेज फिर्यादी विद्यार्थीने पाठविला असेल म्हणुन 'हाय हु आर यु' असे म्हणुन फिर्यादीने पाठविले परत काही दिवसानी शंकरजीचा फोटो पाठविला दि. 18/01/22 चे 00.41 वा. अज्ञात आरोपीने अश्लिल स्वरूपात व्हिडीओ पाठविले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ) भादंवी. सहकलम 67 (अ) कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि साखरकर मो.नं 7350902100 हे करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत मौजा बुधवारीपेठ वार्ड नं. 3 उमरेड येथे फिर्यादी नामे– सुरेश ईश्वर कळमकर, वय 55 वर्ष रा. बुधवारीपेठ उमरेड वार्ड क्र. 3 उमरेड याचे ॲक्सीस बॅकेचे अकांउट असुन या बॅकेचे क्रेडीट कार्ड हे 3 महीने आधी आले असता 'सदर क्रेडीट कार्ड सुरू करायचे आहे काय'? असा ॲक्सीस बॅकेचे अज्ञात महिला आरोपीने फिर्यादीस दि. 18/01/2022 रोजी दुपारी 14.00 वाजता दरम्यान फिर्यादीच्या मोबाईल वर फोन करून फिर्यादीस म्हटले, 'कि तुम्ही ॲक्सीस रिवोर्ड नावाची लिंक ओपन करा व क्रेडीट कार्ड चे 16 अंकी नंबर व एक्सपायरी डेट दया' फिर्यादीचा मोबाईल वर आलेला ओटीपी मागुन फिर्यादीचे अकाउन्ट मधुन ऑनलाईन फिर्यादीचे क्रेडीट कार्ड वरून 95,000/–रू. काढुन घेत फिर्यादींची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरूध्द कलम 420 भादंवि. सहकलम 66 (ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री यशवंत सोलसे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर